## रे.दि.मु.क्र. ३३/२०२१ मधील निशाणी क्र. २७ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांना दाव्याची लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करून त्यांचे विरुद्ध दिनांक २७/०४/२०२२ रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल करून त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर स्वीकारण्यात यावी याकरिता दाखल केला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागील बाजूसच त्याचे म्हणणे दाखल केले आहे.

२) प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रतिवादी हे सांगली येथे राहण्यास आहेत. प्रतिवादी क्र. १ ही अडाणी व अशिक्षित स्त्री आहे. तिला लिहिता व वाचता येत नाही. तथापि, पहिली तारीख ज्यावेळी हजर होण्यास नेमलेली होती त्यावेळी वादीने प्रतिवादी क्र. १ चे राहते घरी येऊन उद्या तारीख आहे असे सांगून सदर तारखेस आणले होते. वादी हा प्रतिवादी क्र. १ चा सख्खा भाऊ असल्याने त्याचेवर विश्वास ठेऊन प्रथम हजर राहण्याच्या तारखेस प्रतिवादी क्र. १ वादी सोबत मे. न्यायालयात हजर होती. त्यावेळी वादीने प्रतिवादीस जर मे. न्यायालयाने विचारले तर माझी काही तक्रार वा हरकत नाही असे सांगितले होते. तथापि, सदर तारखेस मे. न्यायालयाने प्रतिवादी क्र. १ हिला काही विचारले नाही. त्यामुळे वादी म्हणतोय तसे काही कोर्टात सांगितले नाही. ज्यावेळी तारीख करून प्रतिवादी क्र. १ हिने सांगली येथे तिचे माहितगार लोकांना सदर दाव्याचे समन्स दाखविले असता सदरहू लोकांकडून वादीने प्रतिवादी क्र. १ हिचे विरुद्ध खोटा दावा केल्याचे समजून आले.

३) प्रस्तुत प्रतिवादींचे पुढील कथन असे की, त्यानंतर प्रतिवादीने तारखेची चौकशी करून त्या दिवशी जत कोर्टातील माहितगार वकिलांना वकीलपत्र दाखल करण्यास विनंती केली. त्यानंतर सदरहू वकिलांनी प्रतिवादी क्र. १ हिच्या वतीने वकीलपत्र दाखल केले व पुढील तारीख घेतली. पुढे प्रतिवादी क्र. १ ही आजारी पडली व प्रतिवादी क्र. २ याचा अपघात झाला. त्याचेवर औषधोपचार सुरू आहेत. त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ हिचा बराच वेळ व दिवस निघून गेले. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना प्रस्तुत दाव्यास वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. प्रस्तुत प्रतिवादींनी जाणूनबुजून कैफियत देण्याची टाळाटाळ केलेली नाही. वरील कारणास्तव कैफियत

देण्यास विलंब झालेला आहे. तरी, सदरचा विलंब न्यायाच्या दृष्टीने माफ होऊन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जर, त्यांची कैफियत दाखल करून न घेतल्यास प्रस्तुत प्रतिवादींचे न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. कैफियत दाखल करून घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट न्याय होण्यास सुलभता येईल. तरी अशा परिस्थितीत झालेल्या उशिराची माफी मिळून प्रस्तुत प्रतिवादीविरुद्ध झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल होऊन या अर्जासोबत दाखल केलेली त्यांची लेखी कैफियत दाखल करून घेणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

४) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास असे प्रतिकथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर वादीला मान्य व कबूल नाही. प्रतिवादी यांच्या विरुद्ध एकतर्फा दावा चालविण्याचा आदेश झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात किती दिवसांचा विलंब झाला आहे हे नमूद केले नाही. त्यांना बराच विलंब झालेला आहे. तरी त्यांना जास्तीत जास्त दंड करून अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

६) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा कराराचे पालन होऊन विशेष रितीने खरेदीखत पूर्ण होऊन मिळण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. दावा उभय पक्षकारांच्या स्थावर मिळकतीतील हक्क व हितसंबंधाबाबतचा आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात नमूद केलेली कारणे ही सारासार बुद्धीच्या आधारे विचारात घेण्यासारखी आहेत. तसेच उभय पक्षकारांमधील वाद विषयाचे स्वरूप विचारात घेतले असता वाद विषयाचे अंतिमतः गुणदोषावर निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारे प्रस्तुत प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. तसे न केल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत निर्माण होवून प्रकरणांची अनेकता देखील होण्याची शक्यता आहे. सबब, प्रस्तुत प्रतिवादींना त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे जरुरीचे आहे असे माझे मत आहे. सबब, प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जासोबत विलंबाने दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुत प्रतिवादींना दावा समन्सची बजावणी दि.

२३/१२/२०२१ रोजी झाल्यानंतर ते दि. २१/०२/२०२२ रोजी हजर झाले. त्यानंतर त्यांचे विरुद्ध दिनांक २७/०४/२०२२ रोजी विना कैफियतीचा आदेश झाल्यानंतर त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि. ३०/०७/२०२२ रोजी दाखल केला आहे. अशाप्रकारे त्यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेल्या एकूण विलंबाच्या कालावधीचा सारासार विचार करता वाद विषयाचे अंतिमतः निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारेही प्रस्तुत प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. त्यामुळे प्रकरणातील सर्व परिस्थितीचा व वरील सर्व कारणांचा विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादींनी वादीला खर्चाची एकूण रक्कम रुपये २००/- देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादींनी वादीला खर्चाची एकूण रक्कम रू. २००/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादींनी वादीला वर आदेशीत केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्यांचे विरुद्ध दिनांक २७/०४/२०२२ रोजी झालेला विना कैफियतीचा आदेश रद्दबातल करून त्यांची लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्यांनी या अर्जासोबत दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. अनुषंगिक आदेश निशाणी क्र. १ खाली पारित करण्यात यावा.

EKNATH KOYAPPA CHOUGALE
Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2022.08.19 12:35:35 +0530

स्थळ:- जत (एकनाथ को. चौगले)
दि. १२/०८/२०२२ (JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १२/०८/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १२/०८/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १९/०८/२०२२. |